# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**


## विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणुकींसाठी महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख या मतदारसंघांच्या तात्पुरत्या मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत

## जाहिर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **१० अध्यापक** आणि कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये **०३ विद्यापीठ अध्यापक** अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे **०२ अध्यापक** विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **०३ विभागप्रमुख** प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून देण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ८ मधील तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांच्या तात्पुरत्या मतदार याद्या तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहित) **गुरुवार, दिनांक १५ सप्टेंबर, २०२२** रोजी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या आहेत.

सदर तात्पुरत्या मतदार याद्यांमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी संबंधितांनी **गुरुवार, दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ ते सोमवार, दिनांक १९ सप्टेंबर, २०२२** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे :**

१. विद्यापीठाच्या https://bcud.unipune.ac.in या लिंकवर Teacher Profile मध्ये login करुन Registration for Election 2022 या लिंकवर click केल्यास आपल्या अर्जाबाबतची स्थिती पाहता येईल.

२. यासंदर्भात तात्पुरत्या मतदार याद्यांमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर तेथे उपलब्ध करुन दिलेल्या Submit Grievance या लिंकवर click करावे व तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी.

मतदार नोंदणीस अपात्र ठरलेल्या अर्जांबाबत कोणतेही दस्तऐवज अथवा कागदपत्रे नव्याने अपलोड करता येणार नाहीत किंवा स्विकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ९२
दिनांक : १४/०९/२०२२